## नियमीत दिवाणी मुकदमा क्र. २२/२०१८ मधील नि.क्र.३१ वरील आदेश
## (सय्यद खयुम सय्यद नुरउल हसन व ईतर वि. मुकुंदराव माधवराव जाधव व ईतर)

१. सदरचा अर्ज **मयत अर्जदार क्रं २ सय्यद जैनोदिदन सईद अली** यांच्या वारसांनी त्यांना अभिलेखावर वारस म्हणून घेण्यासाठी दाखल केलेला आहे. गैरअर्जदारतर्फे सदर अर्जावरील पाठीमागील बाजूस त्यांचे म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे.

२. मयत अर्जदार क्रं २ यांच्या वारसांचे कथन असे आहे की, सदरचा अर्ज हा मुंबई रेग्युलेशन कायदयाप्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे कामी गैरअर्जदार यांच्या विरुध्द दाखल केला आहे. अर्जाचे कामकाज प्रलंबीत असताना, अर्जदार क्रं २ हे दिनांक ०९.०८.२०२५ रोजी मयत झाला आहे. मयत अर्जदार क्रं २ यांच्या वारसांना वारसाप्रमाणपत्र मिळणेकामी गैरअर्जदार यांच्या विरुध्द अर्जाचे कारण उरत आहे. तसेच सदरचा अर्ज मुदतीत असल्याने व अर्जदार क्रं १ ते ३ हे मयत अर्जदार क्रं २ चे वारस वारस या नात्याने अर्जात सामील करुन घेण्याची विनंती केली आहे.

३. गैरअर्जदारांच्या वकीलांनी त्यांचे म्हणणे दाखल केले की, गैरअर्जदार यांना मयत अर्जदार क्रं २ यांच्या वारसाबाबत काहीही माहिती नाही. त्यामळे अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

४. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. उभय पक्षांच्या विधीज्ञाचा युक्तीवाद ऐकला.

५. प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरचा अर्ज गैरअर्जदारांविरुध्द वारसापत्र प्रमाणपत्र मिळणेकामी दाखल केला आहे. अर्जदार क्रं २ चे वारसांना गैरअर्जदारां विरुध्द वारसा प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल करण्याचा अधिकार

अस्तित्वात आहे. अर्जदार क्रं २ हे दिनांक ०९.०८.२०२५ रोजी मयत झाले असून सदरचा अर्ज दि १६/०९/२५ रोजी दाखल केला असल्याने तो कायदयाच्या मुदतीत आहे. दोन्ही पक्षकारांचे हितसंबंध विचारात घेता, अर्ज गुणदोषावर न्यायनिर्णय करणेकरीता तसेच वाद विषयाचे अंतीमता निराकरण करणेकरीता व प्रकरणांची अनेकता टाळण्याकरीता न्यायाचे हेतूस्तव अर्ज मंजुर करणे न्यायोचित होईल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदारांना आदेशाप्रमाणे अर्जदार क्रं २ यांच्य वारसांना अभिलेखावर घेण्यास परवानगी देण्यात येते.

३. मूळ अर्जदारांनी अर्जामध्ये तशी दुरुस्ती आदेश तारखेपासून १४ दिवसांच्या आत करावी.

AMARJEET BHARATRAO JADHAV
Digitally signed by AMARJEET BHARATRAO JADHAV
Date: 2025.10.16 16:30:02 +0530

हदगाव (अमरजीत भारतराव जाधव )

दिनांक १६.१०.२०२५ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,

हदगाव जि. नांदेड

**प्रमाणपत्र**

मी प्रमाणित करतो की, या पीडीएफ फाईलमधील मजकूर व मुळ न्यायनिर्णय मधील मजकूर हा एकसारखा आहे.

स्टेनोग्राफरचे नांव : अनिता एस.गोदाम

कोर्टाचे नांव : दिवाणी न्यायालय क.स्तर हदगाव जि. नांदेड

न्यायनिर्णय : १६.१०.२०२५

पिठासीन अधिकारी यांनी सही केलेली तारीखः : १६.१०.२०२५

न्यायनिर्णय अपलोड केलेली तारीखः : १६.१०.२०२५